Open Access
उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका
(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 671 – 675
DOI: 10.5281/zenodo.10279124

**Original Research Article**

# गांधी बापू : मानवतेचा पुजारी

प्रा. डॉ. दिगंबर नागोराव माने

भूगोल विभाग प्रमुख, महात्मा फुले महाविद्यालय अहमदपूर, जिल्हा: लातूर ४१३५१५ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: manedigamber77@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

मी किती वाईट होतो असं सत्य सांगणारा एकमेव महामानव म्हणजे गांधी बापूं "माझे सत्याचे प्रयोग" आत्मचरित्रात गांधींजीनी जे सत्य मांडल अनं एकेकाळी माझे विचार ,कर्म किती वाईट होते आणि मी आयुष्यभर चांगले कर्म करण्यासाठी जी धडपड केली असे साधे सरळ सोपे तत्वज्ञान विचार मांडणारा गांधी बापू अद्यापतरी या पृथ्वीतलावर जन्माला आला नाही. गांधीजीच्या अगोदर जगात होऊन गेलेली इशू ,गौतम बुद्ध ,थोरो या महामानवाने मानव जातीच्या कल्याणासाठी अहिंसा शांततामय सहजीवन, समन्वय, संयम या विचारांची कास गांधीजींनी धरली पण या विचारांना अधिक प्रगल्भ करून मानव कल्याणासाठी गांधीजींनी स्वीकारलेला खडतर मार्ग गांधीजींना इशू गौतम बुद्धाच्या बरोबरीला नेऊन देवत्व बहाल करतो. महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आईन्स्टाईन असं म्हणतात की" काही काळानंतर हा हाडा मांसाचा माणूस गांधी या जगात जन्माला आला होता यावर लोकांचा विश्वासच बसणार नाही ती गांधींना अवतारी पुरुष किंवा देव समजतील " जगातल्या सर्व खंडात आणि बहुतांशी राष्ट्रात गांधीजींचे तत्वज्ञानाचे अध्ययन आणि त्यांचे पुतळे हे गांधीजीच्या उच्च विचाराचे प्रतीक आहे. पण ज्या मातीत गांधी बापू जन्माला आले त्या मातीतील लोकांना गांधी बापूं समजले नाहीत यासारख दुदैव काय असेल या महात्म्याच्या नशिबी सदैव उपेक्षा टिका आणि अवहेलनाच आली या पाठिमागचं कारण गांधी बापू आम्हाला समजले नाहीत ? किंवा गांधी बापूला आम्हाला समजून घेऊ दिल नाही ? उलट सुलट पद्धतीने गांधी बापूंची विचार मांडले गेले आणि गांधी बापू कसा संपेल याचा प्रयत्न केला गेला. या महामानवाची टिंगल टवाळी अगदी सहजपणे करणारा समाज या देशात सर्वत्र आहे" मजबूरी का नाम महात्मा गांधी" बाल मनावर बिंबवले गेलेले "गांधी कट" कटिंग दोन स्त्रियांच्या खांद्यावर हात टाकून चालणारे गांधी बापू हे सर्व दृश्य गांधी बापू किती हिन चरित्र्याचे होते हे दाखवण्याचा कसोसीने प्रयत्न केला गेला दुर्दैव हे आहे की, देशातल्या प्रत्येक महापुरुषांला कोणता ना कोणता धर्म जात पात राजकारण समाजकारण गट तट यांनी स्वीकारला पण गांधी बापू हा एकमेव महामानव आहे की ज्याला अजूनही कोणी स्वीकारायला तयार नाही

**सारांश**

देशभर स्वच्छता अभियान गांधीजीच्या नावाने राबवलं जात एवढेच काय ते गांधीजीचे महत्त्व . प्रत्येक शहरात गावात सार्वजनिक स्वच्छतागृह बस स्टँड रेल्वे स्टेशन गावोगावच्या भिंती बापूच्या चष्म्याने रंगवल्या गेल्या पण या चष्म्याच्या शेजारी उभा टाकून मनसोक्त लघु शंका करणारा मात्र " गांधी बापूं च्या चष्म्यातून " पाहत नाही जर एखाद्या महापुरुषाच्या बाबतीत हीच घटना घडली असती तर समाजात किती मोठा स्फोट झाला असता. नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी आपल्या " इंडियन स्ट्रगल " या ग्रंथात असे नमुद केले आहे की, शहीद भगतसिंग यांची फाशीची शिक्षा टाळण्यासाठी महात्मा गांधीजींनी कसोशीने प्रयत्न केली परंतु इंग्लंडमधील लोकांनी भगतसिंगांना फाशी झाली पाहिजे याविषयी शासनाला वेटीस धरले यापुढे गांधीजीचे काही चालले नाही.१७ फेब्रुवारी १९३१ रोजी गांधींनी व्हाइसरॉयशी या विषयावर चर्चा केली. गांधीजींच्या म्हणण्यानुसार, त्यांनी व्हाईसरॉयला सांगितले की, “सध्याचे वातावरण अधिक अनुकूल बनवायचे असेल तर भगतसिंग यांच्या फाशीला स्थगिती द्यावी.” व्हाईसरॉयने हे प्रकरण मांडल्याबद्दल गांधींबद्दल कृतज्ञताही व्यक्त केली आणि ते म्हणाले, “शिक्षेत बदल करणे ही एक कठीण गोष्ट होती, परंतु सद्यस्थितीचा विचार केला जाऊ शकतो.” परंतु या प्रकरणात गांधीजींना सदैव खलनायक ठरवलं गेलं आणि भारतीय तरुणांच्या मनामध्ये गांधीजी विषयी चिड निर्माण करण्यात आली ही चिड आजही कायम आहे. मागच्या काही दशकात गांधीजींना माननारा मोठा गट कायमचा काळाच्या पडद्याआड निघून गेला गांधीजींची विचारश्रेणी समजून सांगणारी माणसं आज बोटावर मोजण्याइतकीच आहेत यामुळे गांधीजी आणि समाज यात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. पण जेव्हा केव्हा मानव जातीला शांततामय सहजीवन अहिंसा सत्य यासारख्या गोष्टींची गरज भासेल तेव्हा नक्कीच या महात्म्याची. गरज भासेल यात शंका नाही. प्रस्तुत शोधनिबंधाच्या माध्यमातून गांधीजींच्या मानवतावादी विचाराचा थोडक्यात परामर्श घेण्यात आला आहे.

**उद्दिष्ट्ये**

१. कसलाही पूराग्रह दूषितपणा न ठेवता गांधीजीच्या विचाराचा अभ्यास करणे

२. व्यापक सर्वांगीण दृष्टिकोन आत्मसात करून गांधीजींच्या तत्त्वज्ञानाकडे डोळसपणे पाहणे

३. गांधीजी एक विशिष्ट धर्माचे विशिष्ट जातीचे एका विशिष्ट राजकीय पक्षाचे नसून गांधीजी अखंड मानव जातीचे आहेत हा दृष्टिकोन बाळवून गांधीजीच्या विचाराकडे पाहणे.

**हरिजन समाज आणि गांधी**

1932 मध्ये, महात्मा गांधींनी अखिल भारतीय हरिजन संघाची स्थापना केली. अखिल भारतीय हरिजन संघ ही भारतातील अस्पृश्यता निर्मूलनासाठी, हरिजन किंवा दलित लोकांसाठी आणि भारतातील अनुसूचित जातींच्या उत्थानासाठी काम करणारी एक संस्था आहे. संत शिरोमणी जगद्गुरु तुकोबाचा एक सुंदर अभंग आहे या अभंगांमध्ये तुकोबांनी मानव जातीला ची विनंती केली आहे ती  अनुभव सिद्ध आहे

" विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद-भ्रम अमंगळ॥

आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा॥

कोणाही जीवाचा न घडावा मत्सर। वर्म सर्वेश्वरपूजनाचे॥

तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुखदु:ख जीव भोग पावे॥ "

महात्मा गांधीजीच्या जीवनप्रवाहावर जगद्गुरु तुकोबाच्या विचार ाचा मोठा पगडा आहे तुकोबांनी त्या काळामध्ये संतवाणीने समाजातील अनिष्ट रूढी बरोबर मानव जातीतील उच्चनीचतेचे अंतर कायमस्वरूपी संपवण्यासाठी अथांग प्रयत्न केले कदाचित या विचाराला पुढे गांधीजींनी वाहून घेतलेली दिसते पंधराव्या शतकातील महान संत नरसी मेहता यांच्या सुंदर भजन ानी गांधी बापूच्या दिनक्रमाला सुरुवात होत असे.

"वैष्णव जन तो तेने कहिये जे, पीड़ पराई जाने रे |

पर दुख्खे उपकार करे तोये, मन अभिमान न आने रे || "

तुकोबाची जीवन तत्वज्ञानात व महात्मा गांधीजीच्या जीवन तत्वज्ञानात दोघांनीही मानव जातीला विनंती केली आहे की तोच खरा धर्म आहे जो कसलाच भेदभाव न करता प्रत्येक जीवाला आपल्या जीवा समान समजतो प्रत्येक जीवाला जगण्याचा अधिकार आहे या वाणीने जीवन व्यतीत करतो तो खरा मानव तो खरा धर्म या प्रकारची शिकवण संत शिरोमणी तुकोबाच्या शिकवणीप्रमाणेच महात्मा गांधीजीच्या विचारात पहावयाला मिळते म्हणूनच खऱ्या अर्थाने महात्मा गांधीजी " साबरमतीचे संत आहेत " भारतीय समाज व्यवस्थेतील दुर्लक्षित घटकांच्या उत्थानासाठी प्रयत्न करणाऱ्या महामानवामध्ये दरी निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची परस्परभिन्न उद्दिष्टं होती, अशीच गैरसमजूत जाणीवपूर्वक पसरवून हा भेद निर्माण केला जात आहे. काहीजण तर, गांधीजीना दलितांचे शत्रूच मानतात त. 'अस्पृश्य' हीसुद्धा देवाचीच मुलं आहेत,' ही आपली संकल्पना सर्व लोकांपर्यंत पोहोचावी यासाठीच गांधीजींनी 'हरिजन' हा शब्दप्रयोग केला होता; पण त्यांच्या टीकाकारांनी या गोष्टीचा पद्धतशीरपणे चुकीचा अर्थ घेतला आणि ' 'हरिजन' हा शब्द म्हणजे दलितांचा अपमानच आहे,' असा वाद घालण्यास सुरुवात केली. सन १९३२ मध्ये गांधीजींनी एक उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून या संस्थेची स्थापना केली होती : समाजातून अस्पृश्यतेचा शाप दूर करणं आणि धर्म-जात-लिंग-वंश यांच्या आधारावर होणारा प्रत्येक अन्याय-अपमान भेदभाव यांपासून मुक्त असलेल्या समाजाची निर्मिती करणं. या सर्व अपप्रवृत्ती नष्ट झाल्याखेरीज समाजामध्ये एकता, शांतता, सौहार्द आणि विकास शक्य नाही, अशी त्यांची खात्रीच पटली होती. 'हरिजन सेवक संघा'ची स्थापना एका विशिष्ट परिस्थितीत झाली होती. नोव्हेंबर १९३१ मध्ये ब्रिटिशांनी मागासवर्गीयांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याचा निर्णय घेतला. यानुसार प्रांतिक सभांच्या निवडणुकीत दलित उमेदवारांना निवडून देण्याचा अधिकार फक्त दलित मतदारांनाच देण्यात आला होता. अशाच प्रकारचा अधिकार ब्रिटिशांनी आधी मुस्लिमांना दिला होता. डॉ. आंबेडकरांनी अशा प्रकारच्या तरतुदीची मागणी केली होती. पूर्वी मात्र त्यांनी संयुक्त मतदारसंघाचं समर्थन केलं होतं, ज्यामध्ये कोणत्याही जाती-धर्माच्या मतदाराला आपला प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार होता. त्या वेळी पुण्यात येरवड्याच्या तुरुंगात असलेल्या गांधीजींनी दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाच्या योजनेला कडाडून विरोध केला. हिंदू समाजात फूट पाडण्याचा वसाहतवादी सरकारचा हा डाव आहे, असं त्यांचं स्पष्ट मत होतं. ता. २० सप्टेंबर १९३२ ला दोन उद्दिष्टं समोर ठेवून गांधीजी बेमुदत उपोषणाला बसले. एक म्हणजे, ब्रिटिशांच्या 'फोडा आणि राज्य करा' या

धोरणाला विरोध आणि दुसरं म्हणजे, हिंदू समाजातील तथाकथित सवर्ण वर्गांमध्ये सदसद्विवेकबुद्धी जागृत करून अस्पृश्यतेची अमानवी परंपरा बंद करणं. बेमुदत उपोषणाला बसलेल्या गांधीजींच्या जीविताविषयी सर्वसामान्य जनतेला वाटणारी गंभीर चिंता लक्षात घेऊन आंबेडकरांनी सौम्य भूमिका स्वीकारली. त्यानुसार ता. २४ सप्टेंबरला 'पुणे करार' झाला. यावर पंडित मदनमोहन मालवीय ('सवर्ण' हिंदूंच्या वतीनं) आणि डॉ. आंबेडकर (दुर्लक्षित घटकांच्या वतीनं ) यांनी सह्या केल्या ( त्यावेळी 'दलित' शब्दप्रचलित नव्हता ) ब्रिटिश सरकारनं आपला निर्णय मागं घेतला आणि त्याबरोबर गांधीजींनीही त्यांचं बेमुदत उपोषण थांबवलं.या करारातील तरतुदीनुसार, संयुक्त मतदारसंघाच्या चौकटीतच अनुसूचित जातींसाठी आरक्षित जागा ठेवण्यास मान्यता मिळाली होती.'पुणे करारा'चा फायदा असा झाला की, आधीच्या स्वतंत्र मतदारसंघाच्या तरतुदीनुसार दुर्लक्षित घटकांना मिळणाऱ्या ९६ जागांच्या तुलनेत आता त्यांना १४८ जागा मिळाल्या; पण केवळ या करारापुरतं समाधानी न राहता आपलं दुसरं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गांधीजी कार्यरत राहिले.सन १९३३ च्या मे महिन्यात येरवड्याच्याच तुरुंगात असलेल्या गांधीजींनी 'आत्मशुद्धी'साठी आणि समाजात कायम असलेल्या अस्पृश्यतेच्या परंपरेबाबत तीव्र नाराजी म्हणून २१ दिवसांचं उपोषण केलं. त्याच वर्षी नोव्हेंबरमध्ये त्यांनी पुढं नऊ महिने चालणारी - 'हरिजनयात्रा' सुरू केली.अस्पृश्यता कायमस्वरूपी दूर करण्याचं 'सवर्ण' वर्गाला सांगण्याबरोबरच गांधीजींनी हिंदूंच्या मंदिरांची दारं दलितांसाठी खुली करण्याचं आवाहन केलं. 'अस्पृश्यता हा हिंदुवादावरचा 'काळा डाग आहे,' अशी टीका करतानाच त्यांनी 'अस्पृश्यता कायम राहण्यापेक्षा हिंदुवाद नष्ट होणं मला मान्य आहे,' असं जाहीर केलं. आपला संताप व्यक्त करताना ते म्हणाले होते की, 'एखाद्या पाणवठ्याच्या ठिकाणी कुत्रा पाणी पिऊ शकतो; पण हरिजनाच्या मुलाला पाणी पिता येत नाही. जर तो तिथं गेला तर मार खाल्ल्यावाचून त्याची सुटका होत नाही. सध्याच्या अस्पृश्यतेच्या रूढीनं माणसाला कुत्र्यापेक्षाही खालचा दर्जा प्राप्त करून देतात असे गांधीजीने ठणकावून सांगितले होते.

**गांधी बापूंचा अहिंसावाद**

प्रभू येशू ख्रिस्त महामानव गौतम बुद्ध यांच्या तत्त्वज्ञानाने महात्मा गांधीची भारावून गेले होते गांधीजीच्या जीवन जगण्याचा उद्देश हा जणू काय अहिंसेला वाहूनच घेतले आहे असा होता त्यांना या जगामध्ये अहिंसेच्या सत्याच्या मार्गाने प्रश्नांची सोडवणूक करावयाची होती परंतु या महामानवाचे दुर्दैव हे राहिले की एकीकडे जगाने गांधीजीला स्वीकारले परंतु दुसरीकडे भारतीय लोकांनी तरुणांनी गांधीजींचा अहिंसेच्या मार्ग स्वीकारला नाही. विविध प्रकारच्या परीस्थितींमधुन गेल्यानंतर गांधीजींनी अहिंसा हाच एकमेव मार्ग आहे हे पक्के केले.गांधीजींच्या मते अहिंसा हा मनुष्याचा स्थायीभाव आहे.जे देश आणि समाज अहिंसेच्या मार्गाचा अवलंब करतात त्यांनी आत्मसन्मान सोडुन बाकी सगळयाचा त्याग करायला शिकायला हवे.त्यामुळेच अहिंसा हे कुठल्या भित्र्या माणसाचे नाही तर उलट धाडसी माणसाचे लक्षण आहे असे गांधीजी म्हणतात.शिवाय गांधीजींची अहिंसेची शिकवणुक सर्वांनाच पाळणे शक्य असते.त्यासाठी शरीरयष्टी,हत्यारे,साधनसामग्री यांची कशाचीच आवश्यकता नसते.त्यामूळे गांधीजींची ही अहिंसात्माक चळवळ भारतातील सामान्य जनतेत प्रचंड लोकप्रिय झाली.त्याचबरोबर गांधीजींनी सत्याला पण खुप महत्व दिले.ते म्हणतात की इतर सर्व गोष्टींपेक्षा माझे प्रेम अहिंसेच्या तत्वावर आहे.जर अहिंसेच्या तत्वाइतके कशावर माझे प्रेम असेल तर ते आहे सत्यावर.गांधीजी अहिंसा आणि सत्यामध्ये फ़रक बघत नसत.तर अहिंसा हे साधन आहे व सत्य हे साध्य आहे.त्यामुळे जर आपण साधनांची काळजी घेतली तर आपण साध्यापर्यंत पोहोचणारच यात काही शंका नाही असे गांधीजींचे मत

होते.शकतो.कारण त्याला आवश्यक असणारी त्यागाची भावना त्या काळातील सर्वसामान्य भारतीय जनतेत नव्हती.सावरकर म्हणतात की मातृभुमिसाठीची लढाई म्हणजे सतीचे वाण आहे.पण गांधीजींचा मार्ग सोपा होता.कायद्याला विरोध करत २-४ लाठ्या खाण आणि जेलमध्ये जाण त्या काळातील सामान्य जनतेला जास्त सोप होतं. गांधीजींच्या अहिंसेबद्दल अजुन एक महत्वाची गोष्ट अशी आहे की निर्बल आणि हतबल माणसाला त्या पध्दतीने अन्यायाचा प्रतिकार करण्याशिवाय दुसरा कुठला पर्यायच नाही.त्याचमुळे भगत सिंग्,स्वातंत्र्यवीर सावरकर व इतर क्रांतिकारकांनीही आपल्या तुरुंगवासात होणाऱ्या अन्यायाविरुध्द अहिंसात्मक सत्याग्रहाचा व उपोषणाच्या मार्गाचा अवलंब केलेला दिसतो.म्हणजे गांधीजींच्या मार्गाचे जे कट्टर विरोधक होते तेसुध्दा दुसरा कुठला उपाय नसल्यावर त्याच गांधीजींच्या मार्गाचा अवलंब करतात. गांधीजींच्या मार्गाचा एक मुद्दा हा की जर सरकार अन्याय करत असेल, सरकारकडे कितीही मोठी शस्त्र असु देत पण जर संपुर्ण जनतेनीच सविनय कायदेभंग केल्यास सरकारला अन्यायी राज्य करणे अशक्य आहे. हे म्हणजे सरकारची शक्तीच काढुन घेतल्यासारखे आहे.तुम्ही काहीही कायदे करा पण आम्ही ते अन्याय्य कायदे पाळणारच नाही पण आम्ही तुमच्यावर हल्लाही करणार नाही.अशा परीस्थितीत सरकार काय करेल ? जगामध्ये मानव जातीने एकमेकावर धाक जमवण्यासाठी असेल किंवा अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्यासाठी असेल अनेक युद्ध महायुद्ध केली. करत आहे परंतु गांधी बापूंनी सांगितलेला अहिंसेच्या आणि सत्याच्या मार्गावर मानव जात पूर्णतः दूर जाऊ शकली नाही हेच गांधी बापूंच्या तत्वज्ञानाचे अंतिम सत्य आहे म्हणूनच की काय परत एकदा उपोषण सारख्या मार्गाचा अवलंब करून व्यक्ती समाज न्याय मागत आहे

**निष्कर्ष**

१. आजच्या पिढीने गांधीजीच्या विचारांना समजून घेतले पाहिजे.
२. समाजात ज्या पद्धतीने गांधीजीच्या विरोधात विचार मांडली गेली त्या विचाराला विरोद्ध म्हणून नव्हे तर गांधीजीची जगण्याची विचारश्रेणी काय होती ? याची पुर्नमांडणी झाली पाहिजे
३. गांधीजी या देशातील कुठल्याही पक्षाचे धर्माचे जातीचे नाहीत ही भावना कायम लक्षात ठेवली पाहिजे.

**संदर्भ ग्रंथ**

१. माझे सत्याचे प्रयोग- महात्मा गांधीजी
२. महात्मा गांधी - गो.द.पहीनकर
३. गांधी एक अध्ययन - रमेश सक्सेना
४. गांधीजी का दलित चिंतन - भंवरलाल